# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी खुर्द,
## तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे - ४१२ ४०५

दूरध्वनी ०२१३३-२२५९०० फॅक्स ०२१३३-२३०५८३

Website – www.gcoeara.ac.in, e mail – gcoeara@gmail.com

जा. क्र. शाअसंमअ / आस्था. / २०१६ / 84 दि. 07 JAN 2016

## परिपत्रक

**विषय - अधिकारी / कर्मचारी यांचा निवासाचा पत्ता कार्यालयाकडून प्रमाणित करून मिळणेबाबत**

उपरोक्त विषयास अनुसरून नमूद करण्यात येते की या संस्थेतील अधिकारी / कर्मचारी यांचेकडून त्यांचा निवासाचा पत्ता कार्यालयाकडून प्रमाणित करून मिळणेबाबातचे अर्ज प्राप्त होत असतात. संबंधित अधिकारी / कर्मचारी हे त्याच्या अर्जासोबत जे कागदपत्र सादर करतात त्यावरून ते निश्चितपणे त्याच पत्त्यावर निवास करीत असल्याची खात्री करता येत नाही. कार्यालयाकडून निवासाचा पत्ता प्रमाणित करणे ही महत्वाची बाब असून त्यासाठी कागदपत्रांची योग्य पडताळणी होणे आवश्यक आहे. उपरोक्त बाब लक्षात घेता आता या संस्थेतील सर्व अधिकारी / कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की अधिकारी / कर्मचारी यांना त्यांच्या निवासाचा पत्ता संस्थेकडून प्रमाणित करून घ्यावयाचा असल्यास त्यासाठी त्यांनी खालील कागदपत्रांची स्वयंसाक्षांकित प्रत त्यांच्या अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील -

१) **अधिकारी / कर्मचारी भाड्याने निवास करीत असल्यास** - भाडेकराराची प्रत व अर्जाच्या दिनांकाच्या लगतच्या मागील महिन्याची घर भाडे पावतीची प्रत

२) **अधिकारी / कर्मचारी शासकीय निवास स्थानामध्ये निवास करीत असल्यास** - शासकीय निवास स्थान वाटप आदेशाची प्रत, अर्जाच्या दिनांकाच्या लगतच्या मागील महिन्याचे विद्युत देयकाची प्रत व सदरचे देयक अदा केल्याच्या पावतीची प्रत

या पुढील काळात वरीलप्रमाणे कागदपत्रे सादर केल्याशिवाय अधिकारी / कर्मचारी यांचा निवासाचा पत्ता कार्यालयाकडून प्रमाणित करून देण्यात येणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी. या परिपत्रकाच्या दिनांकापर्यंत कार्यालय स्तरावर ज्या अधिकारी / कर्मचारी यांचे अर्ज प्रलंबित आहेत ते सर्व अर्ज नस्तीबद्ध करण्यात येत आहेत. संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी या परिपत्रकाच्या अनुषंगाने कागदपत्रे सादर केल्यासच त्यांचा निवासाचा पत्ता कार्यालयाकडून प्रमाणित करून देण्यात येईल.

(प्रा. श्री. वि. जोशी)
प्र. प्राचार्य,
शा. अ. व सं. म., अवसरी

प्रत - विभाग प्रमुख - यंत्र / स्वयंचल / अणुविद्युत / स्थापत्य / संगणक / उपकरणीकरण / उपयोजित विज्ञान / कर्मशाळा / ग्रंथालय / कार्यालय यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी -

त्यांनी हे परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

परिपत्रमाणित
11-01-2016

Head Computer Engg. Dept.
Govt. College of Engg. & Research
AWASARI (Kh.) 412405